**मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री यांनी घोषित**
**<u>केलेले विशेष पॅकेज अंमलबजावणी.</u>**
**विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपायोजनेतंर्गत द्यावयाच्या शैक्षणिक सवलतीकरिता आकस्मिकता निधी अग्रीम रु.१४,१८,००,००० मंजूर करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय , क्र.एफइडी-२००९/३८/०९/केंपुयो,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २० ऑगस्ट, २०१०.

संदर्भ:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एफइडी-२००९/(०६/०९)/केंपुयो,दिनांक २७ फेब्रुवारी,२००९.
२) शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्र.आकनि-११.१०/२७/अर्थसंकल्प-८, दिनांक १३ ऑगस्ट,२००९.

**<u>शासन निर्णय :-</u>**

मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री यांनी घोषित केलेले विशेष पॅकेज अंमलबजावणी अंतर्गत पश्चिम विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलती देण्याचा संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी,२००९ अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश देण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम व वर्धा या ६ जिल्हयांतील अत्यंत अडचणीत असलेल्या शेतक-यांच्या ४,३४,२९९ कुटुंबातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्याचा प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी सन २००८-०९ व सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी २७१७७९ इतक्या लाभार्थ्यांना रु. १४,१८,००,००० इतके अर्थसहाय्य आकस्मिकता निधीतून अग्रीम म्हणून मंजूर करण्यात येत आहे. यातून होणा-या खर्चावर शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नियंत्रण ठेवावे. यासाठी खर्च करतांना रु. १४.१८ कोटी या मंजूर अनुदानापेक्षा वाढीव खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. यावर होणारा खर्च मागणी क्र. "ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण- ८०-सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, ०२ संकीर्ण, (०२) (५०) विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांच्या मुलांना

शैक्षणिक सवलती, (२२०२ H १५१) दत्तमत, ३१ सहायक अनुदाने, आकस्मिकता निधी सांकेतांक (८००० ५३९३) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल." हा खर्च शासन ज्ञापन वित्त विभाग, क्र. आकनि-११.१०/२७/अर्थसंकल्प-८, दिनांक १३ ऑगस्ट,२०१० अन्वये रु. १४,१८,००,००० (रु. चौदा कोटी अठरा लाख फक्त) एवढया मंजूर रकमेच्या अग्रीमातून भागविण्यात यावा.

३. यासाठी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. शासन पत्र, वित्त विभाग, दिनांक ३ जून,२००९ अन्वये दिलेल्या सूचनांचा विचार घेऊन त्यांनी हा निधी खर्च करावयाचा आहे या रकमेच्या वापराचे जे आदेश काढण्यात येतील त्या आदेशात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट,१९८६ च्या परि-२ (१) मध्ये दर्शविलेल्या परिच्छेदाचा अंतर्भाव करावा व सदर आदेशाची जी प्रत नियंत्रण अधिकारी / विभाग प्रमुख यांना पाठविली जाईल त्या प्रतीमध्ये हा परिच्छेद लाल शाईने अधोरेखित करण्यात यावा. तसेच त्याबाबतचे विवरणपत्र वित्त विभाग तसेच सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना व या व विभागास पाठवावे. त्याचप्रमाणे अग्रीमामधून प्रत्यक्ष मासिक खर्च केल्याची एकत्रित माहिती या महिन्यानंतरच्या १५ तारखेपर्यंत या विभागास व वित्त विभाग,अर्थसंकल्प-८ यांना पाठविण्यात यावी.

४. आकस्मिकता अग्रीमातून उपलब्ध झालेल्या निधीतून खर्च करतांना वित्त विभाग परिपत्रक क्रमांक सीएनएफ- १०८३/१४०/ अर्थसकंल्प-३, दिनांक २६ एप्रिल, १९८३ व शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट,१९८६ यामधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००८२०१७०११३००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

20/8/2010

**( अश्विनी देशमुख )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ),महाराष्ट्र राज्य, पुणे

विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती/नागपूर.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
महालेखापाल, १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
महालेखापाल, १/२, (लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, पुणे.
वरिष्ठ कोषाधिकारी, जिल्हा पुणे.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र शासन यांचे खाजगी सचिव, यांना माहितीस्तव
मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, यांना माहितीस्तव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव
कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
मा.प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक.
निवड नस्ती, केंपुयो.